**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,**
नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१
**दूरध्वनी क्रमांक : २६१२२८४६ / ४७** **Email - ccrcs.general@gmail.com**

---

जा.क्र.१५-सआ/सहकार पुरस्कार/२०२५ 1437 दि :- १५/०७/२०२५

**प्रति,**

१. **विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था सर्व (प्रशासन/लेखापरीक्षण).**
२. **जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).**
३. **जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ (सर्व).**

**विषय- सन २०२३-२४ मधील सहकार पुरस्कार वितरण कालबध्द कार्यक्रमामध्ये सुधारणा करणेबाबत.**

**संदर्भ-** १. कार्यासन अधिकारी १८-स यांचेकडील क्र.संकिर्ण ०५२५/प्रक्र.९०/१८-स दि.०३/०६/२०२५ चे पत्र.
२. या कार्यालयाचे जाक्र.१५-सआ/सहकार पुरस्कार/सन२०२३-२४/४५३ दि.१३/०६/२०२५ चे पत्र.

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्र.१ चे शासन पत्रान्वये सहकार पुरस्कार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी वितरीत करावयाच्या पुरस्कारांबाबत पात्र संस्थांची छाननी करुन प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

सहकार पुरस्कार संदर्भात शासन निर्णयामध्ये सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. या सूचनांनुसार सहकार पुरस्कारासाठी सहकारी संस्थांचे प्रस्ताव मागविणे, छाननी करणे, मुख्यालयास सादर करणे, मुख्यालय स्तरावरील समितीने शिफारसपात्र संस्थांची यादी तयार करुन शासन स्तरावरील समितीस सादर करणे या बाबतचा कालबध्द कार्यक्रम संदर्भ क्र.२ अन्वये आपणास कळविण्यात आलेला आहे.

सदर कालबध्द कार्यक्रमात अंशत: बदल करण्यात येत असून सहकारी संस्थांनी आपले सहकार पुरस्कारासाठीचे प्रस्ताव सादर करण्याबाबत खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कार्यवाहीचा दिनांक/ कालावधी | करावयाची कार्यवाही | कार्यवाही करणारे कार्यालय | प्रस्तावांच्या संख्येचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | दि.०२/०७/२०२५ ते ३१/०७/२०२५ | सहकारी संस्थांनी आपले पुरस्कारासाठीचे प्रस्ताव ज्या तालुक्यात त्यांचे मुख्यालय आहे त्या तालुक्याचे तालुका सहाय्यक निबंधक / उपनिबंधक यांचेकडे सादर करणे.<br>१. जिल्हा स्तरावर गट नियम/प्रकार नियम किमान १० संस्थाचे प्रस्ताव आवश्यक<br>२. संस्थेचा प्रस्ताव दाखल होत असतांना आवश्यक ती सर्व कागद पत्रे सोबत असल्याची खात्री करावी. अपूर्ण कागदपत्रे पूर्ण करुन घेणे बाबत संबधितांना मार्गदर्शन करावे. | तालुका सहाय्यक निबंधक / उपनिबंधक | - |

| अ. क्र. | कार्यवाहीचा दिनांक/ कालावधी | करावयाची कार्यवाही | कार्यवाही करणारे कार्यालय | प्रस्तावांच्या संख्येचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| ३ | दि.०१/०८/२०२५ ते ११/०८/२०२५ | तालुका सहाय्यक निबंधक / उपनिबंधक यांनी जिल्हा उपनिबंधक यांचेकडे छाननी करुन प्रस्ताव सादर करणे | तालुका सहाय्यक निबंधक / उपनिबंधक | सहा.निबं. यांचे कडून प्राप्त होणारे सर्व प्रस्ताव |
| ४ | दि.१२/०८/२०२५ ते २२/०८/२०२५ | जिल्हा उपनिबंधक समितीने छाननी करुन प्रस्ताव विभागीय सहनिबंधक यांचेकडे सादर करणे | जिल्हा उपनिबंधक | १:४ |
| ५ | दि.२५/०८/२०२५ ते ०८/०९/२०२५ | विभागीय सहनिबंधक समितीने छाननी करुन प्रस्ताव सहकार आयुक्त कार्यालयाकडे सादर करणे | विभागीय सहनिबंधक | १:३ |
| ६ | दि.०९/०९/२०२५ ते २६/०९/२०२५ | सहकार आयुक्त स्तरावरील समितीने प्रस्ताव छाननी करुन शासनाकडे पाठविणे | सहकार आयुक्त | १:२ |
| ७ | दि.२९/०९/२०२५ ते १३/१०/२०२५ | शासन स्तरावरील मा. मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पुरस्कार प्राप्त संस्थांची अंतिम निवड करणे | - | - |
| ८ | शासन मान्यतेने दिनांक घेणे. | पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन व पुरस्कारांचे वाटप | - | - |

या कामासाठी आपल्या कार्यालयातील एका जबाबदार अधिकाऱ्याची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करावी. नोडल अधिकाऱ्यांनी कार्यालय प्रमुखाच्या मार्गदर्शनाखाली प्रस्ताव मागविणे व प्रस्ताव छाननी करुन विहित मुदतीत वरिष्ठ कार्यालयास सादर करण्याचे काम करावे.

प्रस्तावांची छाननी करुन शिफारस करण्यासंदर्भात उपरोक्त संदर्भानुसार व त्याअनुषंगाने निश्चित केलेले भाग -अ, भाग-ब व भाग-क प्रमाणे छाननी निकष व मार्गदर्शक सूचनांनुसार कामकाज करावे व कोणतेही विवाद उपस्थित होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सर्व प्रस्ताव कार्यालय प्रमुखाचे स्वाक्षरीने सादर करावेत. जेणे करुन शिफारस प्राप्त संस्थेच्या प्रस्तावाची संपुर्ण जबाबदारी कार्यालय प्रमुखाची राहील.

(दिपक तावरे भा.प्र.से)
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत- कार्यासन अधिकारी- १८-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय मुंबई-४०० ०३२.**

**प्रत उचित कार्यवाहीस्तव-**

१. अपर निबंधक, (प्रशासन), (पतसंस्था) (तपासणी व निवडणुका),(लेखापरीक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे.
२. कार्यासन अधिकारी (सर्व) मुख्यालय पुणे.
३. खाजगी सचिव कक्ष, मुख्यालय पुणे.